**निशाणी २५ सोबत**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. २ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

| | |
|---|---|
| माझे नाव – गिरजाजी कारभारी जाधव, | वय – ७४ वर्षे, |
| व्यवसाय – शेती, | राहणार – अंबड, |
| तालुका – अकोले, | जिल्हा – अहमदनगर. |

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. दिनांक २७.०६.२०२३ रोजी पोलीसांनी मला अकोले पोलीस स्टेशन येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. पोलीसांनी माझे समक्ष कोणताही पंचनामा केला नव्हता. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही असून त्यातील मजकूर मला आठवत नाही. सहीस **निशाणी २९** देण्यात येते.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७.०६.२०२३ रोजी पोलीसांनी मला पिंपळगाव निपाणी येथे विलास तोरमल यांचे घरी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे फिर्यादी दिपक भोर याने दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे विलास तोरमल याचे

**निशाणी २५ सोबत**

घरापासून ५ फुट अंतरावर होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळाचा दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा हा माझे समक्ष त्या ठिकाणी लिहीला, तो मला वाचून दाखवला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्याकरीता मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. के. बी. हांडे यांच्या मार्फत**

उलटतपास नाकारला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.12.17 17:28:56 +0530

दिनांक १७.१२.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले .